अमेरिकेतही वाजतोय मराठी साहित्याचा डंका

# News report from Tarun Bharat, Goa

पणजी

मराठी संस्कृती आणि मराठी साहित्याचा झेंडा आता सातासमुद्रापार लावण्याची कामगिरी अनिवासी भारतीयांनी केली आहे. प्रत्येक मराठी माणूस आणि तमाम भारतीय यांच्यासाठी ती अभिमानाची गोष्ट आहे. ब्रहन्महाराष्ट्र मंडळाने अमेरिकेच्या विविध शहरांमध्ये आतापर्यंत १३ अधिवेशने भरविली आहेत. १४वे अधिवेशन २ ते ५ जुलै २००९ या काळात फिलाडेल्फियामध्ये होणार आहे. मराठी माणूस म्हणून आणि मराठी साहित्य व संस्कृती यांची ओळख अमेरिकेत करून देताना आनंद वाटत असल्याचे ब्रहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष गिरीश ठकार व प्रमुख संयोजक मुकुंद कुटे यांनी सांगितले.

फिलाडेल्फिया ही अमेरिकेची आद्या राजधानी. त्यानंतर वॉशिंग्टन ही अमेरिकेची राजधानी झाली. प्रथमच फिलाडेल्फियामध्ये साहित्य संमेलन भरविले जात आहे. अमेरिकेत स्थायिक झालेल्यांमध्ये दोन लाख आणि भाषिक आहेत. केवळ ईस्टकोस्टमध्ये २५ हजार मराठी कुटुंबे आहेत. मराठी संस्कृती, परंपरा, साहित्य यांचे दर्शन सर्वांना व्हावे, या उदात्त हेतूने संमेलने भरविली जातात. पहिले संमेलन शिकागो येथे भरविण्यात आले. त्यानंतर दर दोन वर्षांनी ही संमेलने होत गेली. डेट्रॉईट, टोरांटो, लॉस एंजलीस, बाल्टिमोर, ह्यूस्टन, बोस्टन, सेनोज, कॅनडा, न्यूयॉर्क, ॲटलांटा, सियाटल आदी शहरांत आतापर्यंत संमेलने भरविण्यात आली आहेत. फिलाडोल्फिया शहराशी भारतीयांचे वेगळे नाते आहे. पहिला गणेशोत्सव अमेरिकेत फिलाडेल्फियामध्ये झाला. भारताच्या पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी या फिलाडेल्फियामधूनच डॉक्टर झाल्या. त्यामुळे या शहराला भारतीयांच्या मनात वेगळे स्थान आहे.

दर दोन वर्षांनी होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाला सुमारे चार हजार प्रतिनिधींची उपस्थिती असते. ग्रामीण भागात संमेलन झाल्यास उपस्थिती कमी असते. टेक्सास, न्यूयॉर्क, न्यूजर्सी, ईस्टकोस्ट या भागात भारतीय कुटुंबांची संख्या  मोठी असल्याने तिथे जास्त प्रतिसाद मिळतो. या संमेलनात भारतीय साहित्यिक, प्रतिनिधी यांची संख्याही मोठी असते. पन्नास टक्के सहभाग भारतीय प्रतिनिधींचा असतो, असेही ते म्हणाले.